ISSN : 2393-8900
IMPACT FACTOR : 1.9152 (UIF)

# Historicity

## International Research Journal

VOLUME-IV JAN.2018
UGC APPROVED

**SPECIAL ISSUE**

Theme

## Contemporary History and Research Methodology



# Interdisciplinary National Seminar

# Contemporary History and Research Methodology

6 Jan. 2018



**Chief Editor**
Dr. Sanjay Gaikwad (H.O.D)

**Editor**
Dr. R. N. Jadhav

Organized by

Solapur Itihas Sanshodhan Mandal, Solapur (MS)
&
Bharat Mahavidyalaya, Jeur (Cen. Rly) (Tal-Karmala, Dist-Solapur)

# Historicity

## International Research Journal

**Chief Patron**
Dr. Vasant Shinde
Director/Vice-Chancellor
Deccan College, Deemed University, Pune,
Maharashtra

**Editor-In-Chief**
Dr. Sanjay Gaikwad (H.O.D)
M.H. Mahadik Arts and Commerce College,
Modnimb, Solapur, Maharashtra

**Editor**
Dr. Ravikiran Jadhav
D.B.F. Dayanand College Of Arts & Science,
Solapur, Maharashtra

The views expressed in this volume are solely of the individual Author/Researchers and not of the Editors or Publisher.

index


| | |
|---|---|
| 1 | स्त्री चळवळ आणि नियतकालिक<br>प्रा.डॉ.सुनिता श्रीपती कांबळे |
| 2 | ब्रिटीशकालीन शेतकरी उठाव व राजकारण<br>प्रा.आर.जे.लोखंडे |
| 3 | **A Critical study of Chhatrapati Shivaji Maharaj's Environmental utilization.**<br>**Prof. Lokhande Narayan Sopan** |
| 4 | महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास<br>प्रा.डॉ.अरविंद दळवी |
| 5 | यादवकालीन सोलापूर जिल्ह्यातील व्यापार (वाणिज्य) एक दृष्टीक्षेप<br>मानव किसन कांबळे |
| 6 | आत्मसम्मान की लडाई - सुनो शेफाली<br>प्रा. झाकीरहुसेन मुलाणी |
| 7 | नाथ संप्रदाय- मध्ययुगीन सशक्त धार्मिक आंदोलन<br>मा. प्राचार्य-डॉ.एस. के. जोगी |
| 8 | मध्यकालीन हिन्दी इतिहास, सन्त काव्य एवं लोक-दृष्टि<br>प्रा डॉ संजय नाईनवाड |
| 9 | पर्यटनात ऐतिहासिक किल्ल्यांचे महत्त्व<br>डॉ.जिजाबाई कांगणे |
| 10 | १७ व्या शतकातील दुष्काळ निवारण<br>प्रा. पाटील एच. पी. |
| 11 | पेशवेकाळातील मद्यपान आणि शासन व्यवस्था : १६३० ते १८१८<br>प्रा.डॉ.पाटोळे डी.एन. |
| 12 | **"Reflection of Classless Society in the Communist Manifesto"**<br>**Prof.R.V.Patil** |
| 13 | हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात औसा तालुक्याचे योगदान<br>डॉ. शहाजहान शेख |
| 14 | लेणी स्थापत्य कला<br>प्रा.डॉ रविराज नामदेव कांबळे |
| 15 | संगीत कलेचे आश्रयदाते : राजर्षी छत्रपती शाहू महाराज<br>प्रा.महेश जगन्नाथ साखरे |
| 16 | संशोधनासाठी संशोधकाची पात्रता<br>प्रा. डॉ. ओमशिवा वि. लिगाडे |
| 17 | सेंद्रीय शेती काळाची गरज<br>प्रा.शोभा विष्णुपंत खंदारे |
| 18 | मध्ययुगीन कला स्थापत्य - तळेगाव येथील ऐतिहासिक गढी<br>प्रा. डॉ. डि. एस. बिराजदार |
| 19 | **Archaeological Investigation in Solapur District, Maharashtra : Some Observations**<br>**Ravikiran Jadhav** |
| 20 | **HISTORICAL TOURISM A SOURCE OF ECONOMICAL DEVELOPMENT**<br>**Dr. Sanjay Gaikwad** |
| 21 | **An Explorative study of Corporate Social Responsibilities (CSR) in Conservation of Heritage: Its Present Scenario and Prospects**<br>**Dr. Prabhakar Nagnath Kolekar** |
| 22 | कोल्हापूर जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे नेतृत्व : रत्नाप्पाण्णा कुंभार<br>डॉ.व्ही.एस.येलमार |
| 23 | महात्मा फुले यांच्या शेतकऱ्यांविषयक विचारांचे समकालिन महत्व<br>प्रा. तानाजी जाधव |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सत्याग्रहाविषयी विचार<br>प्रा.थोरे किशोर धोंडिबा |

# ब्रिटीशकालीन शेतकरी उठाव व राजकारण

प्रा.आर.जे.लोखंडे
सहाय्यक प्राध्यापक
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा ता - करमाळा, जि.सोलापुर (महाराष्ट्र)

**प्रास्ताविक -**

ब्रिटिश राजवट भारतातील कोणत्याही जाती - जमातीने अथवा वर्गाने कधी संपूर्णत: स्वीकारली नाही की सहन केली नाही. हया राजवटीला अशिक्षित व सुशिक्षित सर्व थरांतून विरोध झाला. अशिक्षितांचे परकीय राजवटीविरुध्दचे उठाव आपल्याकडे नोंदले गेले नाहीत. आजचे नवे लेखक, विचारवंत व इतिहासकार हया अशिक्षितांनी केलेल्या संघटित - असंघटित उठावांना प्रकाशात आणण्याचे काम करु लागले आहेत.

इंग्रजी राजवटीविरुध्द शेतकऱ्यांनी जी बंढे केली, ती भारताच्या बहुतेक सर्व प्रांतामध्ये घडून आली आहेत. महाराष्ट्ह्यात पुणे व नगर जिल्हयात सावकारशाही आणि ब्रिटिश वर्चस्वाविरुध्द शेतकऱ्यांनी जे उठाव घडवून आणले, त्यास दखखनी उठाव असे नाव आहे. सरकारच्या जुलमाविरुध्द व शेठ - सावकारांनी केलेल्या शोषणाविरोधात मऱ्हाटी प्रदेशात शेतकऱ्यांनी लढे दिले. हया लढयांच्या कहाण्या मोठया रोमहर्षक आहेत.

आपली राजवट स्थिरावल्यावर ब्रिटिशांनी मुंबई इलाख्यात सारा - महसुलाच्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. त्यांनी दखखनमध्ये ज्या रयतवारी पध्दतीची अंमलबजावणी केली, ती कुणब्यांवर अन्याय करणारी होती. रयतवारी पध्दतीमळे सरकार व कुळे हयांचे परस्परसंबंध बदलले. मराठयांच्या राजवटीत शेतसारा एकतर्फी पध्दतीने आकारला जात नव्हता. त्या शेतकऱ्यांची व त्या गावाची सारा भरण्याची कुवत दिली आहे, हे पाहून साराआकारणी केली जात असे. दुष्काळ, प्लेग किंवा अवर्षण अशा संकटांत साऱ्यामध्ये सूट दिली जाई किंवा शेतसारा माफ केला जात असे परंतु ब्रिटिशांनी ज्या जमीनमहसूल सुधारणा केल्या, त्यात इंग्रजांचा फायदा हे प्रमुख सूत्र होते. ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापारी कंपनी गुंडाळल्यावरही इंग्रजांची नफेखोर वृत्ती बदलली नाही. शेतकऱ्यांचे जास्तीत जास्त शोषण करुन सरकारी तिजोरी भरावयाची, हे इंग्रजांच्या सारा महसुलाचे ब्रीदवाक्य होते. इंग्रजांच्या धोरणामुळे गावोगावच्या शेतजमिनी मालमत्ता बनल्या. त्या विकणे, गहाण ठेवणे शक्य झाले व त्यांवर पैसा मिळविणे हा आता काही व्यावसायिकांचा धंदा बनला. वाणी, सावकार, शेटजी ही मंडळी शेतकऱ्यांच्या जमिनी स्वत:कडे गहाण ठेवून वा विकत घेऊन शेतकऱ्यांना रोक ड पैसा पुरवू लागली. शेतकरी हा व्यवहारात नागवला जाऊ लागला. त्या असंतोषाचा भडका उडून महाराष्ट्रात गावोगावी शेतकऱ्यांचे दंगे सुरु झाले. पुण्यात व अहमदनगरमध्ये शेतकऱ्यांच्या ज्या दंगली झाल्या, त्या प्रातिनिधिक स्वरुपाच्या मानल्या जातात. महाराष्ट्रात व साऱ्या देशात रयतेचा क्रोधाग्नी जागा झाला. त्यात परकीय सरकार नव्हे, तर आपलीच स्वार्थी, आपमतलबी माणसे भरडली गेली.

गावोगावी राहणारे सावकार सर्व जाती - धर्माचे होते. त्यात विशेषकरुन मारवाडी जमातीचे जास्त लोक होते. मारवाडातून - राजस्थानातून आलेल्या शेठ - सावकारात व रयतेमध्ये जसे बऱ्यापैकी संबंध होंते. मराठा किंवा मुस्लीम राजवटीत हया सावकारांनी वा बनियांनी शेतकऱ्यांना नाडले नाही, पण इंग्रज सरकार आले व हे सामाजिक आर्थिक संबंध बदलून गेले. बनिया मंडळीवर देशी सरकारांचा अंमल होता. त्यामुळे आपल्याच देशबांधवांचे शोषण करण्याची त्यांना हिंमत झाली नाही, पण इंग्रज येताच हया सावकारांना मोकळे रान सापडले. पैसे देण्या-घेण्याच्या, गहाण ठेवण्याच्या, जमिनी देण्या-घेण्या संबंधीच्या व्यवहारांत एकदम बदल झाले.

रयतवारीमध्ये सरकारला देणे असलेला सारा चुकविणे अशक्य होते. दुष्काळ वा अतिवृष्टी किंवा अवर्षणामुळे शेती पिकली नाही, की कुणबी अडचणीत यावयाचे. ते अव्वाच्या सव्व दराने म्हणजे कधी कधी साठ टक्के दराने कर्जाऊ रक्क मा हया ग्रामीण भागातील सावकारांकडून घेत व त्याचा सरकारी तिजोरीत भरणा करीत. सावकाराच्या खातेवहीत एकदा का त्या अडाणी शेतकऱ्याचा अंगठा लागला की, त्या सावकारी पाशातून त्याची सुटका होणे कठीण होते. पंचायत पद्धतीच्या न्यायव्यवस्थेचा बोजवारा उडाला होता. ब्रिटिशांच्या आधुनिक न्यायपद्धतीत वकील नावाचा चलाख वर्ग अस्तित्वात आला. त्यामुळे न्यायालयात कर्जाचे दावे वाढू लागले. 'एकटया अहमदनगरच्या जिल्हा न्यायालयात इ.स.१८३५ ते ३९ हया पाच वर्षाच्या कालावधीत कज्जे - खटल्यांची संख्या शंभर टक्क्यांनी वाढली.'[१] पाटील व पंचायतीचा दरारा राहिला नाही. इंग्रज सरकार, त्यांचे एजंट - पोलीस व न्यायाधीश आणि सावकार असे दुष्ट त्रिकूट जन्माला आले. त्यामुळे कुणब्यांच्या हालअपेष्टांना पारावार उरला नाही. सावकार मंडळींची संख्या वाढत गेली. एकटया परनेरमध्ये (जि.नगर), ५० सावकार राहत होते.[२] इ.स.१८७० मध्ये पारनेर एक छोटे खेडे होते. पुण्याजवळ असलेल्या उरुळी (कांचन) मध्ये बाराशे वस्ती होती पण सावकार मात्र पाच होते.[३]

सावकारांच्या व इंग्रज सरकारच्या जुलूमशाहीला कंटाळून गाव सोडून परागंदा होणऱ्यांची संख्या ब्रिटिश काळात खूप वाढली. गोल्डस्मिड, प्रिंगल हया सरकारी मंडळींनी केलेली आकारणी चूक होती. इंदापूरमधील शेतकऱ्यांनी मुंबईच्या गव्हर्नरला पुन्हा सर्व्हे करण्याची विनंती केली. (अधिक माहिती महाराष्ट्रगाथा - खंड पहिला - मध्ये वाचावी) हया शेतकऱ्यांची बाजू पुण्याच्या सार्वजनिक सभेने घेतली. हया सभेचे नेते बहुतांशी ब्राहमण होते व त्या काळातील मराठी शेतकरी हा कुणबी मराठा हया जातीचा होता. शेतीशी संबंधित एक नवा तणाव. एक सामाजिक - आर्थिक असंतोष मराठा मुलुखात जन्माला आला. पुण्याच्या सुशिक्षित ब्राहमण नेत्यांनी सार्वजनिक सभेच्या शाखा सोलापूर, बार्शी, सातारा, नगर, कोल्हापूर येथे काढल्या. आपले कार्यकर्ते ग्रामीण भागात पाठवून वस्तुनिष्ठ माहिती जमविली. आकारणी ज्या गृहितांवर आधारलेली होती ते आधार चुकीचे आहेत, हे सार्वजनिक सभेने पुरावे देऊन प्रसिध्द केले. सरकार हया सारा आकारणीच्या प्रकरणात चक्क तोंडघशी पडले.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सुबत्ता नाही, शेतकऱ्यांकडे फक्त दोन भांडी व एक झोपडी शिल्लक उरली आहे.' असा निष्कर्ष सार्वजनिक सभेने काढला. भीमथडी तालुक्यात 'कर भरु नका' अशी मोहीम सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांनी चालविली. त्यामुळे

पुण्याचा कलेक्टर संतापला. पुणे परिसरात सारा आकारणी, त्याचे दर, वसूल करण्याची पद्धती हया मुद्द्यावरुन रयत आणि सरकार हया दोन्हीत संघर्षाला सुरुवात झाली. 'सारा भरणार नाही, हे मी कदापि मान्य करणार नाही, पण साऱ्याचा फेरविचार करण्यास मी तयार आहे.' हे पुण्याच्या कलेक्टरचे उद्गार इंग्रजांनी पत्करलेल्या शरणागतीचे निदर्शक आहेत. शेवटी संतापून 'आम्ही हया उठावाचे नेते पकडून त्यांच्या जमिनी जप्त करु.' अशी धमकी सरकारने दिली. रयत व सरकार हयांच्या आरोप - प्रत्यारोपांना ऊत आला व अशातच हे शेतकऱ्यांचे स्वयंस्फूर्त उठाव महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात घडून आले. पुणे व नगरच्या परिसरात हयाची तीव्रता जास्त होती. हा उठाव पूर्णपणे स्वयंस्फूर्त होता.

सरकारवर उघडपणे हल्ला करण्याची हिंमत नसल्यामुळे सावकार, वाणी, मारवाडी हयांच्यावर राग निघाला. हया मंडळीवर कडकडीत बहिष्कार टाकण्यात आला. गावच्या समारंभात, गावजेवणात हया मंडळींना बोलवायचे नाही. ही सावकार मंडळीच बांडगुळाप्रमाणे आपले शोषण करतात, सरकारचे पोलीस व न्यायखाते हे सावकारांना मदत करते, असा प्रचार गावागावात सुरु झाला.

नगर व पुणे परिसरात मावळ, इंदापूर, पुरंदर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत येथे सावकारांच्या मालमत्तेवर हल्ला करण्यात आला. त्यांच्या हिशोबाच्या चोपडया जाळण्यात आल्या. हया दख्खनी उठावात रयतेच्या संयमाचेही दर्शन घडते. जीवित ज्ञ् हानीच्या घटना मात्र तुरळक घडल्या. हा लढा बराचसा अहिंसक पद्धतीने लढला गेला. काही ठिकाणी सावकारांचे नाक कापण्यात आले. सावकारांना विद्रूप करण्याच्या घटना तुरळक आहेत. हया उठावाचे लक्ष्य होते हिशोबाच्या चोपडया! 'मुंबई इलाख्याच्या सरकारने जी सुधारणेची (?) प्रक्रिया सुरु केली होती, त्या विरुध्दची संतप्त प्रतिक्रिया म्हणजे हे उठाव, असे रविंदरकुमार हयांचे मत आहे.[६] ग्रामीण भागाची स्वायत्तता - स्वयंपूर्णता आणि ग्रामीण समाजात आजवर टिकून राहिलेली शांतता आणि एकीची भावना ब्रिटिशांच्या सारा - महसूल व्यवस्थेतील बदलामुळे धोक्यात आली.

१८७५ - ७६ चे दख्खनी उठाव (परकीय)सरकार व सावकार हया दोघांवर प्रहार करणारे होते. मात्र हया दख्खनच्या शेतकरी दंग्यांना अंगभूत मर्यादा होत्या, हेही हया संदर्भात ध्यानात घ्यायला हवे. उठावात भाग घेणाऱ्या शेतकऱ्यांसमोर स्पष्ट ध्येय नव्हते. त्यांच्यात राष्ट्रवादाची जाणीवही फारशी तीव्र नव्हती. त्यांचा असंतोष हा प्रामुख्याने त्यांना सोसाव्या लागणाऱ्या व्यावहारिक अडचणीतून जन्मास आला होता. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व उठाव विस्कळीत व एकाकी स्वरुपाचे होते.

शेतकरी उठावांच्या गदारोळात सार्वजनिक सभा आणि त्या संघटनेचे नेते - गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका व न्या. रानडे हे दोघे प्रसिध्दीला आले. महाराष्ट्रातील कुणब्यांचे आर्थिक शोषण कसे होत आहे. ग्रामीण भागात दारिद्रय वाढण्यास इंग्रजी शासन कसे जबाबदार आहे, हे सभेच्या नेत्यांनी सिध्द केले. हया संघटनेचे ब्राहमणी नेते व ग्रामीण महाराष्ट्रातील कुणबी हे ब्रिटिश राजवटीच्या विरोधात एकत्र आले. जातीय बंधने गळून पडण्याची व महाराष्ट्रात राजकीय प्रवृत्ती वाढीस लागण्याची सुचिन्हे होती. सरकारी आकडेवारी कशी दिशाभूल करणारी आहे, हे सार्वजनिक सभेने दाखवून दिले. 'ग्रामीण प्रदेशात सुखसमृध्दी आली आहे.' असा जो प्रचार सरकारपक्षाकडून केला जात होता, तो सार्वजनिक सभेने खोटा ठरविला.

शेतकरी उठाव हे साऱ्या भारतात घडून आलेले आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ते मराठी मुलखातही घडून आले. हया शेतकरी बंडाच्या कहाण्या रोमहर्षक असल्या तरी इतिहासकारांनी हया थरारक घटनांना अनुल्लेखाने मारलेले आहे. ब्रिटिश राजवटीच्या विरोधात असलेल्या राष्ट्रवादी घडामोडींना, विशेषत: सशस्त्र बंडांना महत्व द्यावयाचे नाही, असा निश्चय आपल्या लेखकांनी केला आहे. शेतकरी उठाव बिहार व महाराष्ट्रात हया उठावाच्या निमित्ताने उपऱ्या मंडळीचे येथे असलेले अस्तित्व आपण कसे खपवून घेतो, ही परप्रांतीय मंडळी स्थानिक जनतेचे चक्क शोषण करतात, तरीही मराठी समाज तो अन्याय सहन करतो, हे स्पष्ट झाले आहे. भारतात इतरत्र जे उठाव झाले, त्यात शेतकऱ्यांनी आपल्यावर जुलूम करणाऱ्याला ठार मारल्याचे दिसते. शेंतकऱ्यांनी अशा रितीने शेकडो जुलूमशहांना ठार मारले. महाराष्ट्राने मात्र हया प्रकरणी संयम दाखविला. शेठ - सावकारांचे नाक कापण्यापर्यंत आणि त्यांच्या हिशोबाच्या वहया जाळण्याइतपतच प्रकरण येथे मर्यादित राहिले! शेजारच्या गुजरातमध्ये शेतकऱ्यांनी आदोलन करुन सरकारला जेरीस आणले, पण महाराष्ट्रात जागृती नसल्यामुळे की काय, शेतकरी बंडखोर बनले नाहीत. इंग्रज राजवटीवर जरी राग असला तरी तो व्यक्त करणे त्यांना जमले नाही. त्यांनी सावकार म्हणजे मारवाडी मंडळींना मात्र हया काळात त्रास दिला. परप्रांतीयांचे आपल्या गावातील अस्तित्व, त्या मंडळीची मग्रुरी, तश्यांचे शोषण हे सगळे मराठी लोकांनी जणू गृहीतच धरले होते. ही दुर्दैवी परंपरा आजही टिकून आहे.

**सार्वजनिक सभा -**

बॉंबे असोसिएशनमध्ये नवे चैतन्य आणण्याचे प्रयत्न सुरु झाले, पण ही राजकीय संघटना तिच्या उच्चभ्रू वृत्तीमुळे जनमानसात तेवढीशी लोकप्रिय झाली नाही. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात नवे राजकीय नेतृत्व उदयाला आले, त्यांना बॉंबे असोसिएशनची कार्यपध्दती आवडली नाही. रानडे, फिरोझशहा मेहता, के.टी.तेलंग हे नव्या दमाचे नेते जनमानसात स्थान मिळवू लागले. मुंबई इलाख्यातील राजकीय वातावरण हळूहळू तापू लागले. (ही चर्चा महाराष्ट्रातगाथा - खंड - १ मध्ये उपलब्ध आहे.)

इ.स.१८७१ मध्ये मुंबईच्या हिंदू रिफॉर्मरने महाराष्ट्रातील राजकीय परिवर्तनाची दखल घेऊन मार्मिक टीका टिप्पणी केली आहे: 'बॉंबे असोसिएशन व ईस्‌अ इंडिया असोसिएशची मुंबई शाखा हयांचे काम थंडावलेले आहे. वर्षातून एक किंवा दोन बैठका घेण्यापलीकडे हया संस्था फारसे काही करत नाहीत.'[७] राजकीय पोकळी भरुन काढण्यासाठी टाऊ न असोसिएशन ही नवी राजकीय संस्था जन्माला आली, पण ती जास्त काळ तग धरु शकली नाही. मुंबई शहराचे प्रश्न सोडविण्यासाठी विनायक जगन्नाथ शंकरशेठ हयांनी काही काळ पुढाकार घेतला. त्यामुळे शंकरशेठ पार्टी असे नामाभिधान मिळालेला एक नवा पक्ष मुंबईत उदयाला आला व लुप्तही झाला.

हया सगळया पार्श्वभूमीवर द वेस्टर्न इंडिया असोसिएशन ही नवी संघटना जन्मास आली (१८ एप्रिल १८७३). मुंबईतील हया घडामोडीची स्थानिक वृत्तपत्रांना चीड आली. बॉंबे असोसिएशनसारख्या एका नामांकित संस्थेला नावारुपास आणण्याऐवजी हया नव्या नव्या संघटना पावसाळी भूछत्राप्रमाणे का अवतीर्ण होत आहेत, असा सवाल वृतपत्रांनी केला.

देशातील सार्वजनिक जीवनाने हवा तसा आकार न घेतल्यामुळे ह्या क्षेत्रात अराजकसदृश परिस्थिती होती. ह्या संस्था - संघटनांची आवश्यकता आहे, पण अशी समाजोपयोगी विश्वासार्ह संस्था काही पुढे येत नाही ही अवस्था एकट्या मुंबई प्रांताची नव्हती, तर कमी - अधिक फरकाने सर्व प्रांतात हीच परिस्थिती होती. राजकीय व सामाजिक जीवनाला आकार देण्याचे प्रयत्न मुंबई प्रांत, बंगाल प्रांत व मद्रास प्रांतात चालू होते. इतर प्रदेशात मात्र अशा हालचाली सुरु झाल्या नव्हत्या. बॉंबे असोसिएशन आणि ब्रिटिश इंडिया असोसिएशन ह्यांना एकत्र करण्याचे प्रयत्नही झाले. १८७८ मध्ये मार्च महिन्यात नेटिव्ह प्रेस कॉन्फरन्स भरविली गेली. त्या परिषदेत पुण्या - मुंबईतील सार्वजनिक संस्था. मुंबईपेक्षा पुण्यात वेगळे वातावरण होते. शैक्षणिक संस्था, सार्वजनिक जीवन, सुसंस्कृत वृत्ती ह्या बाबतीत मुंबई पुण्यापेक्षा वरचढ होती, पण पुण्याला जो मराठ्यांना जुन्या राजधानीचा स्वाभ होता, पुण्यात जे मराठमोळे वातावरण होते, पुण्यातील राजकीय संस्कृतीला जो एकजिनसीपणा होता, तो कॉस्मोपॉलिटन मुंबईत नव्हता. ब्राह्मणी नेतृत्व लाभलेल्या पुण्यात राजकारण व राजकीय संस्था - संघटना ह्यांच्या उदयासाठी जास्त अनुकूल वातावरण होते. पुण्यात क्रांतिकारकांचे अनेक क्लब, मंडळे अस्तित्वात आली होती, पण मुंबईत सशस्त्र क्रांतिकारिकतेचे लोण पोहोचलेनव्हते. पुण्यात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात राजकीय खून, सशस्त्र दरोडे, खटले ह्यांचे पेव फुटले, पण मुंबई शहरात मात्र गव्हर्नर जनरल आणि चिरोलसारखे पत्रकार 'पुण्यातील उपद्व्यापी (!) मंडळींवर लक्ष ठेवा, पुणे हे भारतातील असंतोषाचे केंद्र बनू लागलेले आहे, विशेषतः येथील कोकणस्थ ब्राह्मणांवर कडी नजर ठेवा,' असे इंग्रज प्रशासनाला बजावून सांगत होते. बॉंबे टाइम्स आणि स्टॅंडर्ड चे संपादक रॉबर्ट नाईट ह्यांनीही आपल्या वृत्तपत्रातून आपल्या इंग्रज बांधवांना, पुण्यातील 'मराठा देशभक्ती व येथील ब्राह्मणीवाद धोकादायक आहेत. ह्या स्थानिक परंपरा व राजकारण आपल्याला मोडून काढावे लागेल', असा इशारा दिला होता.[८] ग्रँट डफने तसेच रिचर्ड टेंपल ह्या मुत्सद्द्यांनेही हे इशारे पन्नास - साठ वर्षापूर्वी दिलेले होते. 'पुण्याने एकेक काळी संपूर्ण हिंदुस्थानवर राजकीय वर्चस्व मिळवले होते, त्या वैभवाच्या आठवणी पुणेकर विसरलेले नाहीत. संधी मिळताच पुन्हा ते राज्य हिसकावून घेण्याचा प्रयत्न करतील, तेव्हा सावध रहा,' असे तमाम इंग्रज अधिकाऱ्यांचे मत होते.

इंदु प्रकाश ह्या अँग्लो - इंडियन वृत्तपत्रात एका वाचकाने मुंबई - पुण्यातील फरक स्पष्ट केला होता. 'मुंबईची बनिया संस्कृती आहे, तेथे हायब्रीड वातावरण आहे पण पुण्यात स्वातंत्र्याच्या कल्पनेने पेटलेले लोक राहतात.' अशी तिखट प्रतिक्रिया त्याची होती.[९] मुंबई पुण्यापेक्षा जास्त श्रीमंत आहे. जास्त आधुनिक आहे, जास्त पाश्चिमात्य वळणाची आहे, हे जरी खरे असले तरी पुण्यात जी राजकीय एकी आहे, ती मोठी महत्वाची आहे. मुंबईतील अठरापगड जाती, धर्म ह्यांना एकत्र आणणे कठीण आहे, पुण पुण्यातील मर्यादित लोकसंख्येला राष्ट्रकार्यासाठी उठविणे व त्यांना एखाद्या उदात्त कामाला जुंपणे सहज शक्य होते. उर्वरित महाराष्ट्रावर पुण्याचा अंमल चालतो. सातारा, कोल्हापूर व नगर - नाशिकचे लोक पुण्याचे ऐकतात. मुंबई शहर ग्रामीण महाराष्ट्रात आज जसे अनोळखी आहे, तसे १०० - १२५ वर्षापूर्वीही होते. पुण्याबाबत जी आपलेपणाची भावना आज मराठी मुलुखात आहे, तशीच १०० - १२५ वर्षापूर्वीही होती. महाराष्ट्रातील राजकीय आंदोलनात मुंबईला मागे ढकलून पुण्याने बाजी का मारली, पुण्यात एवढया मोठया संख्येने राजकीय नेते आणि चळवळी का जन्मास आल्या, ह्याचे उत्तर पुण्याच्या व्यक्तिमत्त्वात व प्रकृतिधर्मात शोधावे लागेल.

मुंबईत बॉंबे असोसिएशन सुरु झाले, सामाजिक - शैक्षणिक क्षेत्रात हालचाली घडू लागल्या, त्याचे पुण्यनगरीतही पडसाद उमटले. काही विद्वानांच्या मते मुंबईतल्या स्टुडंटस् सायंटिफिक अँण्ड लिटररी असोसिएशनच्या अगोदर पुण्यात पूना डेक्कन असोसिएशन ही संघटना स्थापन करण्यात आली, पण ती फार काळ तग धरु शकली नाही. इ.स.१८६७ मध्ये पूना असोसिएशन किंवा पुणे सार्वजनिक सभा पुणेकरांनी सुरु केली, पण ही संस्थाही पुण्यात मूळ धरु शकली नाही. ह्या संस्थेत रामचंद्र गणेश नातू, गोपाळ हरी देशमुखांसारखी नामवंत मंडळी होती.

२ एप्रिल १८७० रोजी पुण्यात स्थापन झालेली सार्वजनिक सभा हा केवळ पुण्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकीय उत्कर्षातील एक महत्वाचा टप्पा मानला जातो. ही सार्वजनिक सभा भारतातील पहिली प्रातिनिधिक राजकीय संघटना मानावी लागेल. भारतातील कोणत्याही राजकीय संस्थेने वा पक्षाने आपल्या सभासदांना जनतेकडून प्रतिनिधि - प्रमाणपत्र (मुख्तियारनामा) आणायची अट घातली नव्हती. सार्वजनिक सभेने मात्र ह्या मुख्तियारपत्राबद्दल नियम असा केला की, 'प्रत्येक सभासदाने आपण कमीत कमी पन्नास व्यक्तींचे प्रतिनिधित्व करतो, असे सिध्द करण्यासाठी त्यांच्या स्वाक्षऱ्या असलेले संमतिपत्र आणावे.' ह्याचा दुसरा अर्थ, सार्वजनिक सभेचा प्रत्येक सभासद हा पन्नास व्यक्तींच्या हितसंबंधाचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करीत होता. दुसऱ्याचे वर्षी ह्या सभेची सभासद संख्या १४० वर पोहोचली. विविध जिल्ह्यातून ६००० लोकांनी निवडून दिलेले ९५ प्रतिनिधी पहिल्या अधिवेशनाला हजर होते.

जनतेच्या हितासाठी जे कायदेकानून आणि सरकारी नियम केले जातील वा त्यांची अंमलबजावणी करणरी जी ब्रिटिश शासन यंत्रणा आहे, त्या सर्वांच्याचर लक्ष ठेवले जाईल. नगरपालिका व देवस्थाने ह्यांची विशेष काळजी घेतली जाईल, प्रत्येक सभासदाने आपले एक दिवसाचे उत्पन्न वर्षातून एकदा सार्वजनिक सभेला द्यावे आणि सभेची प्रतिवर्षी एक बैठक घेतली जावी, असे नियम करण्यात आले. ह्या सभेचे सचिव होते गणेश वासुदेव जोशी. साठे आणि चिपळूणकर ह्यांच्या मदतीने हे जोशी उर्फ सार्वजनिक काका सभेचे दैनंदिन कामकाज पाहत. ह्या संघटनेत सर्व जाती - धर्मांच्या सभासदांचा समावेश झालेला होता. मुसलमान, पारशी आणि ख्रिश्चन जरी तुरळक असले तरी त्यांना सार्वजनिक सभेमध्ये महत्वाचे स्थान होते. सभेमध्ये कोल्हापूर, औंध, अक्कलकोट, कुरुंदवाड, जत आणि सांगलीचे संस्थानिकही सामील झालेले होते. जेष्ठ सनदी अधिकारी आणि वकील मंडळी ह्या संघटनेत बहुसंख्य होती. सभेवर असलेला ब्राह्मणी प्रभावही सहजपणे लक्षात ठेवण्याजोगा होता. पुण्यात सर्व संस्था व संघटनांचे नेतृत्व ब्राह्मणच करीत आले होते, तेव्हा सार्वजनिक सभा तरी त्यास अपवाद का असावी?

पुणे सार्वजनिक सभेने आपल्या पहिल्या दोन वर्षात स्थानिक समस्यांवर भर दिला, मात्र ही संघटना स्थानिक समस्यातच अडकून राहिली नाही. प्रांताच्या पातळीवरील काही महत्वाच्या विषयांतही तिने रस दाखविला. मात्र, आपले कार्यक्षेत्र पुणे व पुण्याच्या परिसरापुरते मर्यादित ठेवले. पर्वती देवस्थानचा कारभार, पुण्यातील दारु दुकानांची संख्या कमी करण्यासाठी आवश्यक ती कारवाई

करणे, डेव्हिड ससून अनाथालयाचे व्यवस्थापन, आळंदी नगरपालिका, मराठी शाळा पुणे कॅंटोनमेंटमध्ये अधिक संख्येने सुरु करणे, हया स्थानिक स्वरुपाच्या समस्या सोडविण्यासाठी सार्वजनिक सभेने प्रयत्न केले. त्याचबरोबर मुंबईच्या हायकोर्टात हिंदी न्यायाधीश नेमण्यासाठी व लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे अहवाल देशी भाषांत प्रसिध्द करण्यासाठी सरकारकडे प्रयत्न करण्यात आले. संस्थानिक सभेमध्ये मोठया संख्येने येऊन दाखल झालेले होते, तेव्हा संस्थानी प्रजेचे हितसंबंध, संस्थाने व ब्रिटिश सरकारच्या परस्परसंबंधाचाही सभेने विचार - विनिमय केला.

इ.स.१८७१ मध्ये नोव्हेंबर महिन्यात म.गो.रानडे हयांचे पुण्यात झालेले आगमन सार्वजनिक सभेला मोठे फलदायी ठरले. रानडे जेथे जातील तेथे सार्वजनिक कार्यात नवे चैतन्य येत असे. सरकारी नोकरीनिमित्त जेथे जेथे त्यांनी वास्तव्य केले, तेथे तेथे त्यांनी नव्या संस्था - संघटना स्थापन करुन सामाजिक - राजकीय क्षेत्रात नव्या चळवळी सुरु केल्या. मुंबईत असताना त्यांनी आपल्या कर्तुत्वाची झलक दाखवलेली होती. समाजसुधारक, विचारवंत, अर्थशास्त्रज्ञ, राजकीय संघटक, शिक्षणतज्ज्ञ म्हणून ते हयाच काळात नावारुपास येत होते. पुण्यात जेव्हा ते येऊन दाखल झाले, तेव्हा ते तीस वर्षाचे होते. त्यांच्या आयुष्याचा ऐन उमेदीचा हा काळ होता. त्यांच्या कर्तुत्वाला खरा बहर हयाच कालखंडात आला. त्यांच्या व महाराष्ट्राच्या सुदैवाने त्यांचे पुण्यानगरीत झालेले आगमन अनेक महत्वाच्या सामाजिक व राजकीय कार्याची नांदी ठरली.

रानडे आणि लोकहितवादी सरकारी नोकरीनिमित्त जेथे जेथे गेले, तेथे तेथे त्यांनी नव्या संस्था स्थापन के ल्या, सरकारी नोकरीची बंधने असूनही हया दोघांनी मुंबई, पुणे, नगर, नाशिक येथे मुक्काम असताना अनेक लोकोपयोगी चळवळी सुरु केल्या. वृत्तीने दोघेही पुरोगामी, दोघेही हाडाचे सुधारक, दोघेही बुध्दिवंत, पण दोघेही इंग्रजी नोकरीत अडकलेले. दादोबा पांडुरंग तर्खडकरही सरकारी नोकरीनिमित्त महाराष्ट्रात अनेक ठिकाणी फिरले, पण त्यांना सार्वजनिक कार्यात विशेष काही करुन दाखवता आले नाही, पण लोकहितवादी व रानडे म्हणजे बोलती चालती सामाजिक चळवळ. जेथे जातील तेथे सामाजिक कार्याचा वणवा पेटवतील. महाराष्ट्रातील प्रबोधनाचे हे दोन मशालक री, परंपरा आणि आधुनिकता हयांचे ते एक अनोखे मिश्रण होते. लोकहितवादी तसे भारतीयांच्यार सामाजिक व धार्मिक अंधश्रध्दांचे कट्टर शत्रू. त्यांना पाश्चिमात्यांचे ज्ञान, विज्ञान आणि आधुनिकता हयांचे जास्त वेड, समाजव्यवस्थेतील भारतीयत्वाबद्दल कमी आदर. रानडे तसे नव्हते. रानडे म्हणजे जुने व नवे, भारतीयत्व व पाश्चिमात्य संस्कृती व विचारांचे मनोज्ञ मिलन! आचारविचारांचे समतोलत्व हयाचा ते एक वस्तुपाठ होते.

सार्वजनिक सभेमध्ये गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काक ा आणि रानडे हयांची जोडी जमली. सार्वजनिक सभेच्या उपक्रमांना वैचारिक मार्गदर्शन करण्याचे काम रानडयांकडे तर उपक्रम तडीस नेण्याचे काम सार्वजनिक काकांकडे अशी कामाची विभगणी गृहीत धरली गेली. सार्वजनिक क्षेत्रात लोकहितासाठी चळवळ कशी उभारावी, ते आंदोलन पुढे कसे रेटावे, हयांचा आदर्श त्यांनी घालून दिला. सरकारने सार्वजनिक सभेच्या नेत्यांवर पाळत ठेवली होती. त्यांच्या विरोधात पुरावे गोळा करण्यासाठी प्रारंभ केला होता, पण ठोस पुरावा सरकारला सापडला नाही त्यामुळे सरकारची निराशा झाली.

सार्वजनिक सभेच्या हया उज्वल कामगिरीमागे न्या.रानडे हयांचे अदृश्य हात आहेत, हे सरकारला चांगले माहित होते. तेव्हा त्यांचा राग सरकारने त्यांच्यावर काढला. त्यांच्या कारवायांची (?) गुप्त चौकशी करण्यात आली आणि शिक्षा म्हणून त्यांच्या बदलीचे सूड - सत्र सुरु झाले. पुण्याहून नाशिक व पुन्हा नाशिकवरुन धुळे अशा त्यांच्या बदल्या झाल्या. पुण्यापासून दूर धुळयात त्यांना नेऊन ठेवले की, सार्वजनिक सभेचे काम थंडावेल असा होरा इंग्रजांचा होता, पण तो खोटा ठरला. एवढेच नव्हे तर ही कारवाई इंग्रजी राजवटीलाच घातक ठरली. कारण न्यायमूर्ती ज्या सामाजिक संस्था तर त्यांनी न्वयाने सुरु केल्याच, त्याशिवाय जुन्या संघटना, ज्या बंद पडल्या होत्या, त्यांनाही पुन्हा सक्रिय बनविले. नाशिक - धुळे अशा दूरवरच्या प्रदेशात पुण्या - मुंबईतील नवविचाराचे लोण अशा रितीने पोहोचले. महाराष्ट्रातील पुनरुज्जीवनाचा प्रसार न्या.रानडयांनी केला. रानडे हे अशा रितीने राजकीय जागृतीचे अग्रदूत ठरले. त्यांची बढतीही सरकारने रोखून धरली, तरी त्याची पर्वा न करता त्यांनी आपले सार्वजनिक काम चालू ठेवले.

**सरकार व रयत हयांतील दुवा -**

सरकार आणि रयत दोन्हीसाठी सार्वजनिक सभेने उपयुक्त कामगिरी बजाविली. दुष्काळ किंवा टंचाईग्रस्त भागाची माहिती गोळा करुन ती सरकारकडे पाठविणे, त्या माहितीच्या आधारावर सरकारवर दबाव टाकू न दुष्काळग्रस्त प्रदेशासाठी दुष्काळी कामे सुरु करणे - हयात रयत व सरकार दोघांचेही हित साधले गेले. रयतेची सेवा झाली. त्याबरोबर ब्रिटिश सरकारला दुष्काळाबद्दल अधिकृत माहिती व आकडेवारी मिळाली. त्यामुळे सरकारचे काम सोपे झाले. मुंबईतील संघटना मुंबई शहरातच अडकून पडल्या होत्या. मुंबईबाहेर असलेल्या ग्रामीण महाराष्ट्राचे काही प्रश्न आहेत, हे मुंबईतील उच्चभ्रू नेत्यांच्या गावीही नव्हते. हया पार्श्वभूमीवर सार्वजनिक सभेनें अधिक डोळस व अधिक जागरुक भूमिका घेतली. सरकार व रयत हयांमध्ये दुव्याचे काम केले. सभेचे कार्यकर्ते सातारा, कोल्हापूर, नाशिक, नगर, जळगाव परिसरात काम करीत होते. हया दूरदूरच्या गावी राहणाऱ्या मातब्बर लोकांना, सुशिक्षितांना सार्वजनिक सभेने कामाला लावले. सरकारच्या दुष्काळ समितीवर अवलंबून न राहता सार्वजनिक सभेने इ.स.१८७२ मध्ये दुष्काळाचा अभ्यास करण्यसाठी आपली स्वत:ची समिती नेमली होती. हया समितीच्या सदस्यांनी दुष्काळग्रस्त लोकांच्या मुलाखती घेतल्या. ग्रामीण परिसरात मोठया प्रमाणावर कर्जबाजारीपणा होता. सरकारला रयतेच्या डोक्यावरील हया कर्जाच्या बोजाची कल्पना नव्हती. शेतसाऱ्याच्या रकमा भरणे शेतकऱ्यांना कसे अवघड चालले आहे व त्यामुळे शेतकरी सावकारांकडून कर्ज घेऊन कसा नागविला जातोय, हयाची यथार्थ कल्पना सभेच्या कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना होती, पण परकीय सरकारचे लागेबांधे सावकाराशी असल्यामुळे सरकार हया समस्येकडे दुर्लक्ष करीत होते. त्यानंतर काही वर्षानीच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शेतकऱ्यांचे दंगे उसळले (इ.स.१८७५) हया दंग्याचे स्पष्ट कारण, वाढीव दराने लागू केलेला शेतसारा हेच होते. शेतकऱ्यांकडून जमा केलेल्या माहितीच्या आधारावर सार्व्जनिक सभेने जी पुस्तिका प्रकाशित केली, त्या पुस्तिकेची टाइम्स ऑफ इंडियाने स्तुती केली.

दुष्काळामध्ये होरपळून निघालेली रयत हा सभेच्या काळजीचा विषय होता. हया भीषण समस्येकडे केवळ महाराष्ट्रापुरते न पाहता सार्वजनिक सभेने निधी गोळा करुन बंगाललाही पाठवला आणि अशा रितीने आपल्या आंतरभारतीयत्वाचे, व्यापक व उदार दृष्टिकोनाचे

उदाहरण जगासमोर ठेवले. ब्रिटिश संसदेमध्ये भारताचे १६ प्रतिनिधी बसतील, त्यांना सरकारने निवडणूक लढविण्यासाठी परवानगी द्यावी, असा आग्रहही सभेने धरला. कीर्तनासारख्या माध्यमाचा उपयोग करुन सार्वजनिक सभेने हमरस्ते, बाजार अशा सोयिस्कर ठिकाणी देशभक्तीवर प्रवचने दिली. जुलै १८७८ पासून तर सभेचे त्रैमासिक प्रसिध्द होऊ लागले.

सार्वजनिक सभेने ब्रिटिश सरकारला शह देण्यासाठी समांतर न्यायालये सुरु केली. लवाद पद्धतीने दिल्या जाणाऱ्या त्या न्यायनिवाड्यांवर तत्कालीन लोकांचाही विश्वास होता. सरकारी न्यायालयातील दिरंगाई आणि खर्चिकपणा टाळून हा जो सोपा, सुटसुटीत व झटपट न्यायदानाचा मार्ग त्यांनी शोधला, तो प्रशंसनीय होता. भारतामध्ये प्राचीन काळापासून चालत आलेल्या पंचायत पद्धतीवर हे न्यायदान आधारलेले होते.बार्शी (जि.सोलापूर) हया गावात १८७४ मध्ये घडलेला हा प्रसंग सार्वजनिक सभेच्या वाढत्या सामर्थ्याची साक्ष देणारा आहे. डब्ल्यू.वेलिंग्टन हा अधिकारी आपल्या वरिष्ठांना कळवितो, 'मी शेतकऱ्यांना उद्देशून केलेले भाषण संपते न संपते, तोच अनेक शेतकरी उठून उभे राहिले. खतपत्रे (साऱ्याची आकारणी सांगणारे पत्र) आम्ही सरकारला दाखवणार नाही आणि सरकार सांगेल त्या दराने आम्ही शेतसारा पण देणार नाही, असे ते ओरडू लागले. मी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण ते शांत बसावयास तयार नव्हते. हया सगळया असंतोषास सोलापूरची सार्वजनिक सभा जबाबदार आहे. मला राहवले नाही, म्हणून हा सारा प्रसंग आपल्या निदर्शनास आणला आहे.'[१०]

सोलापूर जिल्हयातील माढे आणि सोलापूर तालुक्यातही हाच अनुभव आला. १८७२ मध्ये सरकारने जाहीर केलेले दर हया दोन तालुक्यातील शेतकऱ्यांनी स्वीकारले, पण सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांनी रयतेच्या गाठीभेटी घेतल्या, तेव्हा त्याच शेतकऱ्यांनी आम्ही वाढीव दर शेतसारा देणार नाही असे जाहीर केले. साताऱ्याच्या कलेक्टरनेही अशाच स्वरुपाच्या तक्रारी सरकारकडे केल्या. पुणे जिल्हयात भीमथडी तालुक्यातही कर भरु नका अशी मोहीम सार्वजनिक सभेने चालविली. रयतेतील हा असंतोष पाहिल्यावर रेव्हेन्यू कमिशनर डब्ल्यू.एच.हॅवलॉक हयाचा सूर थोडासा नरमला. राजकारणात सभेने फारसा भाग घेतला नाही तरीही बडोद्याच्या मल्हारराव गायकवाडांवर पदच्युतीचा प्रसंग जेव्हा ओढवला, तेव्हा न राहवून सभेने आंदोलनाचा पवित्रा घेतला व सरकारची गैरमर्जी ओढवून घेतली. 'मल्हाररावांना गादीवरुन असे अन्याय्य मार्गाने दूर करु नये,' ही मराठी माणसांमधील भावना, चीड सभेने व्यक्त केली. त्यात तिचे काहीच चुकले नाही, पण सभेने हा जो पवित्रा घेतला, त्यामुळे ब्रिटिश सरकार व अँग्लो - इंडियन वृतपत्रे संतापली. त्यांनी सभेच्या एकूण कामकाजाची व ती करीत असलेल्या कार्याची चौकशी व्हावी, अशी भूमिका घेतली. हया संघटनेचे हितसंबंध सरकार पक्षाला घातक ठरणार आहेत, अशा प्रातिनिधिक संघटना देशात निर्माण होऊ देऊ नयेत, असा प्रचार सुरु केला. सर्वाजनिक सभा स्वत:ला मराठी जनतेची प्रतिनिधी मानत होती. हा दावा तांत्रिक व कायदेशीर दुष्टीनेही खरा होता. त्या काळातील इंग्लिशमन हे इंग्रजधार्जिणे वृत्तपत्र म्हणते - 'लोकप्रतिनिधित्व हे धारदार शस्त्र आहे. भारताच्या राज्यकारभारात ते शस्त्र वापरण्याची वेळ अजुन आलेली नाही. जे नेते व संघटना अशा लोकप्रतिनिधीत्वाचा दावा करतात, त्या ब्रिटिश सरकारशी अनिष्ट स्पर्धा करीत आहेत.'

इ.स.१८७६ मध्ये सार्वजनिक सभेने व्हिक्टोरिया राणीचे अभिनंदन करणारा ठराव दिल्लीकडे पाठविला. दिल्लीमध्ये एका मोठया दरबाराचे आयोजन करुन राणीला भारताची सम्राज्ञी असा किताब देऊन गौरवण्यात आले. दहशतवादी क्रांतिकारक व काही मूठभर स्वाभिमानी संस्थानिक हया समारंभापासून दूर राहिले, पण रानडयांसारख्या नेमस्त देशभक्तांनी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी हया संधीचा पुरेपूर वापर केला. हया निमित्ताने हिंदी जनतेच्या भारतातील ब्रिटिश राजवटीबाबत काय प्रतिक्रिया आहेत, हे त्यांनी शासकांना व जगाला जाहीरपणे सांगितले.

सार्वजनिक सभेने जो खलिता हया ऐतिहासिक सोहळयाच्या प्रसंगी सादर केला, तो रानडयांच्या लेखणीतून उतरलेला होता. भारतातील जनतेच्या ब्रिटिश राजवटीपासून काय अपेक्षा आहेत, हे त्या खलित्यात चपखलपणे व अत्यंत भारदस्त शैलीत सांगितले होते, ङ्गइंग्रजांनी हया देशाला शांतता, सुव्यवस्था, स्थैर्य दिले. हा देश वाहतुकीच्या विविध साधनांनी जोडला गेला. इंग्रजांनी येथे एक आधुनिक शिक्षणपद्धती आणून हया देशाला सुसंस्कृत केले. संस्थानिकांचे संरक्षण, व्यापारवृध्दी, औद्योगिक भरभराट, सत्ताविभाजन, न्याय, निधर्मीवृत्ती, स्वातंत्र्य आणि हक्क (?) ही मंडळी ब्रिटिश राजवटीची देणगी आहे.ङ्घ असे गोडवे न्या.रानडयांनी गायलेले होते.

हया खलित्यात ब्रिटिश साम्राज्याचे गुणगान करतानाच प्रजाजनांच्या आशा - आकांक्षा काय आहेत, हे नमूद करावयास रानडे विसरले नाहीत. 'हिंदी संस्थानिकांना राज्ययंत्रणेत महत्वाचे स्थान दिले पाहिजे, त्यासाठी त्यांचा विधिमंडळात व कार्यकारी मंडळात समावेश करावा. हिंदी जनतेला विधिमंडळात योग्य ते प्रतिनिधीत्व मिळावे. उच्च पदावर लायक हिंदी व्यक्तींची निवड करावी. सारा - महसूलव्यवस्थेत सुधारणा केली जावी.' हया मागण्या त्या खलित्यात मांडलेल्या होत्या. भारतातील नागरिकांनी व संस्थानिकांनी राणीला 'कैसर-इ-हिंद' हा किताब देताना हया भव्य समारोहाचा देशाच्या हितासाठी उपयोग करुन घ्यावा, हे संस्थानिक व हिंदी जनेला बजावून सांगण्यास ते विसरले नाहीत. तशा आशयाचे पत्रच त्यांनी संबंधितांना पाठवले. 'हया भव्य, दिमाखदार शाही सोहळयाच्या धामधुमीत आपले राजकीय ध्येय विसरु नका, आपापसांतील मतभेद विसरुन राजकारणांसाठी एक होण्याची हीच एक वेळ आहे, हे लक्षात असू द्या', असे सार्वजनिक सभा देशवासियांना सांगत होती. ही संस्थानिकांना व हिंदी जनतेला लिहिलेली पत्रे पाहिली की, सभा व तिचे अध्वर्यू रानडे व जोशी दोघे भविष्यातील राजकीय चळवळच जणू घडवीत होते, असे वाटते. राणीला जे काही भारतीय जनतेतर्फे किताब द्यावयाचे, जी काही संबोधने वापरावयाची, जी निवेदने सादर करावयाची, ती सरदारांनी, संस्थानिकांनी व नेत्यांनी आपल्या भोवतालच्या रयतेकडून मंजूर करुन घेतली पाहिजेत. प्रतिनिधित्वाची शास्त्रीय पद्धती, इंग्लंड - अमेरिकेतील परंपरा विसरु नका.' हे नमूद करावयास सभा विसरली नाही. दिल्लीमध्ये भरणाऱ्या हया सोहळयाची संधी साधून सर्व प्रांतातील राजकीय प्रतिनिधी, वृत्तपत्रे व संस्थानिकांनी एक राजकीय परिषद घ्यावी, हयासाठी सुरेंद्रनाथ बॅनर्जी प्रयत्न करीत होते. २७ डिसेंबर १८७६ मध्ये 'द नेटिव्ह प्रेस असोसिएशन' नामक एका राजकीय संघटनेच्या ध्वजाखाली दिल्लीत परिषद झाली. अशा समान राजकीय समस्या सोडविण्यासाठी वर्षातून एकदा हिंदुस्थानातील प्रतिनिधींनी भेटावयाचे असे ठरले. पहिली राजकीय परिषद कलकत्याला आयोजित केली जावी, असा सुरेंद्रनाथ बॅनर्जीचा आग्रह होता. बंगाली नेत्यांनी घेतलेल्या हया राजकीय पवित्र्याला सार्वजनिक सभेने मनापासून साथ दिली. दिल्लीचा

मोहळा आटोपल्यानंतर पुणेकर मंडळी - सार्वजनिक काका, सदाशिव बल्लाळ गोवंडे - हे सार्वजनिक सभेचे दोन सचिव कलकत्याला गेले. तेथील नेत्यांशी वैचारिक देवाणघेवाण त्यांनी केली. त्याच्या पुढील वर्षी इ.स.१८७७ मध्ये बंगाली नेत्यांनी मुंबई - पुण्याला भेट दिली. सार्वजनिक सभेने सुरेंद्रनाथ बॅनर्जी व एस.के.घोष ह्यांना पुण्यात मानपत्र दिले.

पुणे व कलकत्ता येथील राजकीय नेत्यांमध्ये संपर्क वाढू लागला, त्या प्रमाणात राजकीय हालचालीही वाढू लागल्या. गव्हर्नर जनरल लिटन महोदयांना नेटिव्ह प्रेस असोसिएशनतर्फे एक निवेदन दिल्ली मुक्कामी देण्यात आले. लिटनला ही लक्षणे (?) काही ठीक दिसली नसावीत. त्याने ह्या राजकीय हालचाली दडपण्यासाठी व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट (१८७८) संमत करुन ह्या चळवळीतील हवा काढून घेण्याचा प्रयत्न केला. इ.स.१८७८ च्या जानेवारीत सार्वजनिक सभेच्या चार ज्येष्ठ नेत्यांनी पुन्हा कलकत्याला भेट दिली. ह्या भेटीत त्यांनी कलकत्ता परिसरात जास्त काळ मुक्काम केला. पुण्याला परतण्यापूर्वी त्यांनी पुन्हा उत्तर भारतातील काही प्रमुख शहरांत मुक्काम ठोकला. अलाहाबादेत त्यांनी जाहीर भाषणे केली. सार्वजनिक सभा, कलकत्यातील राजकीय संघटनांच्या मदतीने संस्थानिक, वृत्तपत्रे व पत्रकार आणि प्रमुख शहरांतील राजकीय संघटना व नेते ह्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करीत होती. त्याच वर्षी मार्च महिन्यात देशी वृत्तपत्रांचा कायदा संमत झाला. देशातील उमलत असलेले राजकीय नेतृत्व व वातावरण कोमेजू लागले. इंग्रज सरकारच्या दडपशाहीचा वरवंटा देशी वृत्तपत्रांवरुन फिरु लागला. वृत्तपत्रे जी काहीशा निर्भयतेने सरकारच्या धोरणावर टीका करीत होती. ती गप्पगार झाली. सार्वजनिक सभेने ह्या दडपशाहीची तमा न बाळगता आपले कार्य चालू ठेवले. मुंबई प्रांत, हैदराबाद संस्थान व वऱ्हाड येथील देशी वृत्तपत्रांची एक राजकीय परिषद बोलविण्यास आली. मुंबईत २९ मार्च १८७८ रोजी भरणाऱ्या ह्या वृत्तपत्रांच्या परिषदेसाठी बाँबे असोसिएशनचे सहकार्य घेण्यात आले. ह्या परिषदेपूर्वी जो एक जाहीरनामा सार्वजनिक सभेने जारी केला, त्यात पुन्हा भारतीयांसाठी ब्रिटिश संसदेत प्रतिनिधित्व, आय.सी.एस.च्या परीक्षा, आयात - निर्यात कर, हिंदी संस्थानिक, होम चार्जेस, शस्त्रबंदी कायदा, देशी वृत्तपत्रांसंबंधीचा कायदा ह्या विषयांची चर्चा केलेली होती. मुंबईत फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूटमध्ये भरलेल्या परिषदेत ‖नेटिव्ह प्रेस असोसिएशन‖ ची स्थापना मोठा गाजावाजा करुन झाली, पण हे असोसिएशन कधी सक्रिय बनले नाही.

१८८५ मध्ये पुण्यात काँग्रेसचे पहिले अधिवेशन घेण्याचे मुक्रर झाले होते. त्या ऐतिहासिक अधिवेशनासाठी सार्वजनिक सभेने प्रतिनिधींच्या स्वागताची चांगली तयारीही चालवली होती, पण पुण्यात पसरलेल्या कॉलऱ्यामुळे हे अधिवेशन पुण्याहून मुंबईला हलविले गेले व पुन्हा सार्वजनिक सभेला परिस्थितीपुढे नमते घ्यावे लागले. सार्वजनिक सभेचा काळ हा राजकारणासाठी अत्यंत प्रतिकूल काळ. राजकारण कशाला म्हणतात, हे जनसामान्यांना माहीत नाही. राजकीय पक्ष सार्वजनिक जीवनात केवढे महत्वाचे आहेत, हे जनतेला माहित नाही. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना अशा राजकीय पक्षाची स्थापना करुन आपले हिंदुस्थानातील राज्य गमवायचे नव्हते. तेव्हा राजकीय पक्ष, निवडणुका, राज्यघटना, विधिमंडळे ह्यांची त्यांना निर्मितीच करावयाची नव्हती. अशा वातावरणात जन्मलेल्या सार्वजनिक सभेसारख्या राजकीय संस्था अंधारात चाचपडणार, ठेचकाळत प्रवास करणार, हे स्वाभाविकच म्हणावे लागले. सार्वजनिक सभेसारख्या राजकीय संघटनांना पायामध्ये गडप झालेल्या दगडाचा मान दिला पाहिजे. आज स्वतंत्र भारताची एक घटनात्मक व्यवस्था आहे, तेथे शासनसंस्थेच्या तीन शाखा, राजकीय पक्ष ह्या सर्व लोकशाही देशाला आवश्यक असणाऱ्या बाबी आहेत, पण ह्या देशाच्या पायामध्ये गाडल्या गेलेल्या राजकीय संघटनांची कोणाला आठवण नाही. काँग्रेस पक्ष जन्मास येण्याअगोदर ह्या देशाचे राजकीय जीवन जगविण्याचे ऐतिहासिक कार्य त्या संघटनांनी केले आहे.

**वासुकाका जोशी**

सदैव दुय्यम भूमिकेत किंवा मदतनिसाच्या भूमिकेत असणाऱ्या व्यक्तींच्या कर्तुत्वाची दखल इतिहास सहसा घेत नाही. टिळक, गांधीजी, पं.नेहरु तसेच राजगोपालाचारी ह्या नेत्यांचा काळ व कर्तुत्व ज्याने जवळून पाहिले व ह्या महनीय व्यक्तीच्या अनेकविध चळवळीत ज्याने महत्वपूर्ण भूमिका बजावली, पण स्वत:कडे कसलेही श्रेय न घेता व त्याची अपेक्षाही न ठेवता ज्याने देशाची व समाजाची साठ - सत्तर वर्षे सेवा केली, ते वासुकाका जोशी - हे महाराष्ट्राला फारसे ज्ञात नाहीत. देश स्वतंत्र होण्यासाठी सर्व प्रचलित, औपचारिक साधने व मार्ग ह्यांचा त्यांनी अवलंब तर केलाच, पण त्याचबरोबर ह्या देशाची गुलामगिरीतून सुटका व्हावी, म्हणून त्यांनी देशभक्तीची मळलेली वाट सोडून गुप्त राजनीती व क्रांतिकारितेचा काटेरी रस्ताही पकडला. त्यांच्या व देशाच्या दुर्दैवाने त्यांना ह्या कामी फारसे यश लाभले नाही. केवळ समाजकारण, राजकारणच नव्हे तर त्यांनी औद्योगिक विकासासाठीही जाणीवपूर्वक प्रयत्न केले. महाराष्ट्राची औद्योगिक भरभराट हे त्यांचे स्वप्न होते.

वासुकाका जोशी महाराष्ट्राला एक विद्वान, संपादक, फर्डे वक्ते म्हणून फारसे माहीत नाहीत, ते प्रसिध्द आहेत ते लोकमान्यांचे विश्वासू सहकारी म्हणून! लो.टिळक सतत प्रसिध्दीच्या झोतात असलेले नेते. लोकमानसातील आपली प्रतिमा जपण्यासाठी त्यांना बऱ्याच गोष्टी करता आल्या नाहीत. त्याचबरोबर सरकारचा रोष होऊ नये, म्हणून सशस्त्र क्रांतीच्या चळवळीला त्यांना सक्रीय पाठिंबा देता आला नाही. लोकमान्यांच्या अंत:करणात तर ह्या सशस्त्र क्रांतिकारकांविषयी खूप प्रेम होते. ह्या उतावळ्या तरुणांना नियंत्रणात ठेवणे, अविवेकी कृत्ये करण्यापासून त्यांना परावृत्त करणे ही लो. टिळकांची एक महत्वपूर्ण कामगिरी मानली जाते. सशस्त्र क्रांतीशी संबंधित नाजूक, गुप्त व जोखमीची कामे ते वासुकांक ांमार्फत गुपचूप करीत. वासुकाक ांना लो. टिळकांप्रमाणेच विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा सहवास लाभला होता. त्यांच्याबरोबरही त्यांनी विश्वासू मदतनिसाची आपलझी पेटंट भूमिका वठवलेली होती.

वासुकाकांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या समवेत त्यांच्या सर्व उपक्रमांत काम केले होते. निबंधमाला, न्यू इंग्लिश स्कूल, किताबखाना आणि केसरी - मराठा संस्थेच्या विकासासाठी काक ांनी काबाडकष्टाची सारी कामे केली. कर्जात बुडालेल्या चित्रशाळेची इमारत त्यांनी साकारली. चित्रशाळेवरील कर्जाचे बोजे दूर करण्यासाठी त्यांनी राजा रविवर्म्याशीही संधान बांधले. काकांना उद्योजकाची दृष्टी होती. चित्रशाळेत ब्लॉक्सचे काम ते स्वत: करीत. वासुकाकांचा दहशतवादी तरुणांशी निकटचा संबंध होता. स्वातंत्र्याप्राप्तीसाठी रक्त सांडल्याशिवाय पर्याय नाही. ही विचारधारा महाराष्ट्रात व भारतात चांगली रुजलेली होती. लो. टिळक व वासुकाका जोशीसारख्या तत्कालीन नेत्यांनी जरी उभ्या आयुष्यात हाती पिस्तुल कधी घेतले नाही, तरी त्यांनी सशस्त्र क्रांतीच्या चळवळीला जमेल तसा हातभार लावला. सशस्त्र क्रांतीसाठी प्रयत्न करणारा एखादा तरुण लोकमान्यांकडे आला की, त्याची रवानगी काक ांकडे होत असे. लो.टिळक

देशाच्या राजकारणात व अनेकविध चळवळीत गुंतलेले असत. त्यांना हया तरुणांसाठी इच्छा असूनही काही करता येत नसे, आणि तरीही महाराष्ट्रातील व देशातील चळवळे युवक लो. टिळकांशी वेळोवेळी संपर्क साधीत. काका अशा गरजू व अडचणीत आलेल्या युवकांना आर्थिक साहाय्य करीत किंवा दूरवरच्या एखाद्या गावी त्याला लपवून ठेवीत. अज्ञातवासातील हया दुर्दैवी क्रांतिकारकांना काक ांनी हस्ते परहस्ते मदत केली, त्यांना वा त्यांच्या कुटुंबीयांना नोकऱ्या देऊन त्यांच्या योगक्षेमाची व्यवस्था केली. इ.स.१८९७ मध्ये रँडच्या वधानंतर काक ा एकदम भूमिगत झाले. छत्र्यांच्या सर्कशीबरोबर देश - विदेशात हिंडत त्यांनी काही दिवस काढले, त्याची निश्चित कारणे अजून कोणी सांगितलेली नाहीत. चाफेकर - प्रकरणात त्यांचा सहभाग होता, तयावर अधिक संशोधन करण्याची गरज आहे. चापेकरांपैकी बाळकृष्णपंतांना गायब करण्याची व्यवस्था काक ांनीच केली होती. दामोदरपंतांना पकडल्यानंतर उरलेल्या दोन चापेकर बंधूंना त्यांनी सुदूर दक्षिणेत बिसहळ्ळीला दडवून ठेवले. चापेकर बंधू बऱ्याचदा चित्रशाळेत बसत असत. चापेकर प्रकरणाची धूळ खाली बसल्यानंतर काका पुण्यात प्रगट झाले.

महाराष्ट्राच्या सशस्त्र क्रांतीच्या लढयात नेपाळ प्रकरणर एक गूढ अध्याय आहे. स्वातंत्र्याप्राप्तीसाठी नेपाळ व अफगाणिस्तान हया दोन शेजारी देशांची मदत घेऊन ब्रिटिश भारतावर चाल करावयाची व देश स्वतंत्र करावयाचा, अशी एक योजना मराठी तरुणांच्या मनात घोळत होती. हया योजनेला टिळकांनी चालना दिली होती. एवढेच नव्हे तर आपले केसरीतील सहकारी व सुप्रसिध्द नाटककार कृ. प्र.खाडिलकरांना त्यासाठी नेपाळमध्ये पाठवले होते. नेपाळची मदत घेऊन भारताला स्वतंत्र करण्याचा विचार त्या काळात अनेकांच्या डोक्यात घोळत असावा. नेपाळ हे जगातील एकमेव हिंदु राष्ट्र. ते नेपाळनरेश जर त्यासाठी तयार नसतील, तर त्यांच्या सैन्यामध्ये फूट पाडून आपला धाडसी बेत सिध्दीस न्यावा, अशी योजना आखली गेली. इ.स.१९०१ मध्ये कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनाच्या निमित्ताने टिळक व काक ा कलकत्त्याला आले होते. तेथे एक माताजी नामक रहस्यमय स्त्री हया दोघांना भेटली. तिने हया दोघांना नेपाळनरेशांची भेट करुन देण्याचे आश्वासन दिले. ठरल्याप्रमाणे भेटीगाठी झाल्या. पण काम मात्र फत्ते झाले नाही. लो.टिळक, काक ा खाडिलकर हयांनी नेपाळ दरबारात जम बसवला. नेपाळमधून आठ विद्यार्थ्यांची एक तुकडी सैनिकी शिक्षण घेण्यासाठी जपानला पाठविण्यात आली. जर्मनीमधील प्रख्यात क्रप्स कंपनीने लष्करी साहित्याची निर्मिती करणारा एक छोटा कारखाना नेपाळमध्ये सुरु करण्याची तयारी केली. त्या कारखान्याची काही यंत्रसामग्री कलकत्त्याला येऊन नडली, पण ही खबर ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना कोणीतरी दिली. चौकशीची चक्रे सुरु झाली. त्यामुळे नेपाळच्या महाराजांनी लष्करी तयारीसाठी नेपाळात आलेल्या तज्ज्ञांना देश सोडून जाण्यास सांगितले. वासुकाका, कृ.प्र.खाडिलकर, कोल्हापूरचे दामू जोशी, जबलपूरचे हणमंतराव कुलकर्णी हयांनी मोठी घडपड करुन एक चांगली योजना तयार केली होती. पण देशाच्या दुर्दैवाने ही योजना फलद्रूप झाली नाही.

या प्रकरणी श्री देवगिरीकरांनी टीका टिप्पणी करताना म्हटले, 'जास्त कमी पुरावा त्यांच्याविरुध्द सरकारला सापडला असता तर ते दोघे (खाडिलकर व केतकर) व काक ा असे तिघेही फाशी गेले असते अगर जन्मठेपेची शिक्षा भोगत बसले असते.'[११] देवगिरीकर पुढे लिहितात, 'हे नेपाळचे कारस्थान टिळकांना ठाऊक होते. ते वाढले असते व बंडापर्यंत त्याची मजल गेली असती, तर टिळक मागे राहिले नसते. टिळकांनी स्वत: सशस्त्र क्रांतीची (?) कृत्ये केली नाहीत, हे खरे आहे. पण असे समानधर्मी कोणी भेटले, तर त्यांना त्यांनी साहाय्यही केले.'[१२]

पुण्याची चित्रशाळा हे वासुकाकांचे एक चालतेबोलते स्मारक मानावे लागेल. ही संस्था काकानी नावारुपाला आणली. मुंबई प्रांतात पहिला शिळा छापखाना चित्रशाळेनेच सुरु केला. वासुकाका काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनाला हजर असत. इ.स.१८८९ पासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांनी अधिवेशन कधी चुकविले नाही. वारकऱ्यांच्या निष्ठेप्रमाणे त्यांनी काँग्रेस अधिवेशनाला हजेरी लावली, तरी ते अधिवेशनात कधी बोलले नाहीत की त्यांनी कधी ठराव मांडला नाही. टिळक व गांधीयुगापूर्वीची काँग्रेस ही त्या काळात बिगर - राजकीय विषयासाठी गाजत होती. पुण्यातील व महाराष्ट्रातील सनातनी व सुधारकी गट एकमेकांची शक्ती खच्ची करण्यासाठी काँग्रेसच्या अधिवेशनांना जे क्रांतिकारकांचे गट हजर राहत, त्यांच्याशीही काकांचा संबंध येत नसे. देशात सशस्त्र क्रांती घडवून आणण्यासाठी काँग्रेसी अधिवेशनाच्या मंडपात बरीच खलबते चालत. अधिवेशनाच्या निमित्ताने गावोगावी उदयास आलेल्या क्रांतिकारकांच्या गटाशी जान - पहचानही होत असे. इ.स.१८५७ च्या उठावापासून ते इ.स.१९४२ च्या चले जाव चळवळीपर्यंतची महाराष्ट्राची वाटचाल काकांनी अभ्यासली, पाहिली व थोडयाशा प्रमाणात स्वत: अनुभवली. हा काळ फारसा सुखकारक नव्हता. त्या काळाच्या वेदना व त्याची दाहकता त्यांनी वेळावेळी सोसली. पण देशभक्तीचा मार्ग त्यांनी सोडला नाही. पुण्याच्या महर्षी पटवर्धनांप्रमाणे त्यांचे कार्य लोकांना अज्ञात राहिले. सनदशीर, बेसनदशीर म्हणजे सशस्त्र क्रांतिकारिता, जहाल व मवाळ विचारांचे रस्ते त्यांनी तुडविले. शेजारी असलेल्या मित्रदेशांच्या मदतीने एक व्यापक अशी स्वातंत्र्यलढयाची व्यूहरचना. एक आंतरराष्ट्रीय कारस्थान त्यांनी रचले. नेपाळ व अफगाणिस्तानच्या मदतीने देश स्वतंत्र करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. महर्षी पटवर्धनांनीही बडोदा, हैदराबाद संस्थानिकांच्या मदतीने परकीय जोखडातून सुटका करुन घेण्याची जंगी योजना आखली होती. महाराष्ट्राला जसे पटवर्धन माहिती नाहीत, तसे वासुकाक ा जोशीही फारसे माहीत नाहीत. हे त्या दोन नेत्यांचे दुर्दैव की मराठी जनांचे ते दुर्दैव? एक गोष्ट मात्र खरी की, स्वातंत्र्य आंदोलनातील नेहमीची चौकट भेदून हया दोन नेत्यांनी स्वातंत्र्याचा आगळा मार्ग चोखाळला! पण त्यांना नशिबाने साथ दिली नाही.

### हिंदू सेवक समाज

हिंद सेवक समाज हे नामदार गोपाळ कृष्ण गोखले हयांचे बौध्दिक अपत्य मानले जाते. ही संघटना स्थापन करण्यामागे त्यांचा भव्योदात्त दृष्टिकोन होता. देशाबद्दल आणि समाजाबद्दल त्यांना जी आस्था, कळकळ वाटत होती, त्या ध्यासातून हिंद सेवक समाज जन्माला आला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात संस्था - संघटना स्थापन करणे, चालविणे हे बुध्दिवंतांचे फॅड होते.राजकारण करावयास बंदी नसली, तरी ते करण्यासाठी कोणी धजावत नव्हता. राजकारण, मग ते निरुपद्रवी का असेना, ते करीत असताना जर राज्यकर्त्यांची खप्पा मर्जी झाली, तर काय? हया भीतीपोटी राजकीय पक्ष, संस्था काढण्यास लोक घाबरत, पण शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक विकासासाठी मात्र संस्था काढण्याची जनमानसात प्रवृत्ती होती.आप्लया देशात हजारो मैलांवरुन ख्रिश्चन मिशनरी येतात. येथे दवाखाने, शाळा, अनाथालये चालवतात. अत्यंत निरलस भावाने ते समाजाची सेवा करतात. हिंदू समाजाने अव्हेरलेल्या दीन

- दुबळ्यांची सेवा हे मिशनरी मोठ्या प्रेमाने करतात, त्यासाठी ते प्रचंड कष्ट करतात, झीज सोसतात. हे आपल्याला का जमत नाही? एवढी कळकळ, एवढी ध्येयनिष्ठा परधर्मांच्या, परवंशाच्या, परभाषेच्या, परसंस्कृतीच्या माणसाकडे आहे. पण ती करुणा, प्रेम आपल्यात नसावे. हयाचे काही जणांना वैषम्य वाटत होते. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या आक्रमक धर्मांतराची चीड हिंदू समाजात जरी धगधगत होती, तरी त्यांची सेवाभावना अनुकरणीय आहे, असे अनेकांना तीव्रतेने व प्रामाणिकपणे जाणवत होते.

गोपाळरावांच्या मनात ख्रिश्चन मिशनऱ्यांची ही त्यागाची भावना घर करुन राहिली असावी. गोखले - टिळकांचा काळ हा देशभक्तीने भारलेला काळ होता. महाराष्ट्रात व पुण्यात सार्वजनिक सभा, डेक्कन असोसिएशन हयासारख्या संस्था काम करीत होत्या. त्या संस्थामुळे पुण्याची कीर्ती साऱ्या भारतात पसरली होती. नामदार गोखल्यांच्या मनात मिशनरी वृत्ती व त्या वृत्तीने देश व समाजाची सेवा करणारे हे ख्रिश्चन मिशनरी हयांचे जबर आकर्षण होते. अशा धार्मिक प्रेरणेतून व त्यागाच्या भावनेतून प्रेरित झालेले दहा - पंधरा हजार ध्येयवादी तरुण जर आपल्याला येऊन मिळाले, तर आपण हया देशाचा कायापालट घडवून आणू शकू, अशी भावना त्यांच्या मनात वारंवार येऊ लागली. आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेत पाश्चात्य साम्राज्यवाद अत्युच्च कळसाला जाऊन पोहोचला होता. जगभर युरोपियन लोक सर्वश्रेष्ठ आहेत, त्यांचा कोणी पराभव करु शकत नाही असा भ्रम पसरलेला होता. जपानने रशियाचा पराभव केला, ही चित्तथरारक बातमी नामदार गोखल्यांना १९०४ मध्ये समजल्याबरोबर ते विलक्षण हर्षोत्फुल्ल झाले. गोखले मवाळांचे अग्रणी. भारतातील ब्रिटिश राजवट ही देशी लोकांच्या हितासाठी आहे, हिंदी लोकांच्या भौत्तिक कल्याणासाठी इंग्रजांना परमेश्वराने भारतात राज्य करण्यासाठी पाठविले आहे, अशी त्यांची श्रध्दा होती.भारतातील परकीय राजवट जावी, अशी मनोमन तीव्र इच्छा असूनही त्या राजवटीविरुध्द राजकीय जागृती किंवा चळवळ करण्याचा त्यांनी आयुष्यात कधी प्रयत्न केला नव्हता. ङ्गसनदशीर राजकारणाच्या चौकटीत राहून देशाचा जेवढा उध्दार करता येईल तेवढा करावा.दहशतवाद वा लोकसंघटन करुन ब्रिटिश राजवटीला शह देण्यात हशील नाही. जगाच्या सर्व खंडात आपली पाळेमूळे गाडलेल्या ब्रिटिश साम्राज्याला समोरासमोर टक्क र देणे अशक्य.ङ्घ अशी त्यांची धारणा होती. भारतातील परकीय राजवटीला जणू काही त्यांनी गृहीतच धरले होते. पाश्चांत्त्यांच्या जोखडाखाली खितपत पडलेल्या आशियाई आणि आफ्रिकन लोकांच्या मनात जपानच्या हया विजयामुळे आशेचा किरण उगवला. पाश्चिमात्य हे जगात अजिंक्य आहेत, हा खोटा भ्रम पाश्चिमात्यांनीच आपल्या मनात पसरविलेला आहे. इंग्रज, फ्रेंच, रशियन हे युरोपियन्स युध्दात पराभूत होऊ शकतात, आशियाई लोकांनी मनावर घेतले, जाणीवपूर्वक व योजनाबध्दरीत्या जर त्यांनी प्रयत्न केले, तर पाश्चिमात्यांना खडे चारणे अवघड नाही - हे चिमुकल्या जपानने जगाला दाखवून दिले. टाइम्सचा अंक हाती पडताच गोखले त्या वार्तेमुळे थरारु न उठले आणि त्या आनंदाच्या भरात त्यांनी हिंद सेवक समाज स्थापन करण्याचा निश्चय केला.

पाश्चिमात्यशंमध्ये असे काही दुर्मिळ गुण आहेत, ते पौर्वात्यांमध्ये नसल्यामुळे आजतागायत आपण गुलामगिरी सहन करीत आलो. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच एक शुभशकुन घडून आला. जपानने बलाढय रशियाचा आरमारी युध्दात पराभव केला व आपल्या प्रदेशातून रशियनांना हुसकावून लावले. हया घटनेतूमन भारतीयांनाही खूप काही शिकण्यासारखे आहे, आता आळस झटकून कामास लागले पाहिजे. युरोपियन्स ज्या सद्गुणांच्या जोरावर आपल्यावर राज्य करतात, ते गुण संपादन करुन आपण त्यांच्यावर मात केली पाहिजे तरच हया देशाचे नष्टचर्य संपेल. राजकारण, संरक्षणसिध्दता, आधुनिक प्रशासन, विज्ञान व तंत्रज्ञान हया क्षेत्रांत आपण आघाडी मिळविली पाहिजे, असे गोखल्यांना वाटत होते.

गोखल्यांचे कार्य व त्यांचे व्यक्तिमत्व हयांवर भाळून पुण्यातील काही तरुणांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले होते. हे शिष्य त्यांनी चालवलेल्या कोणत्याही कार्यात त्यांना साथ द्यायला तयार होते. त्यांच्या हया शिष्यपरिवारात नरेश आप्पाजी द्रवीड, गोपाळ कृष्ण देवधर व वामनराव पटवर्धन हे प्रमुख होते. हया शिष्यांना एक कायमस्वरुपी काम द्यावे, देशातील तरुण वर्गापुढे अशा राष्ट्रीय वृत्तींच्या मिशनरी लोकांचा आदर्श ठेवावा, हया हेतूने त्यांनी 'हिंद सेवक समाज' स्थापन करण्याचे ठरविले. आपल्या हया संस्थेच्या योजनेविषयी ते म्हणतात, 'सार्वजनिक जीवन हाच धर्म. देशप्रेम असे असावे की त्यापुढे इतर कशाचीच मातब्बरी वाटू नये. उत्कट देशभक्ताला स्वार्थत्यागाचा प्रत्येक प्रसंग मंगल समारंभासारखा आनंदाचा वाटला पाहिजे. हदय वज्रासारखे - संक टाची किंवा अडथळयाची मात्रा चालू न देणारे - पाहिजे. स्वोध्दाराच्या दैवी योजनेविषयी अचल श्रध्दा पाहिजे. इतक्या तयारीनिशी देशभक्ताने आपल्या कर्तव्याचरणास लागावे आणि देश्याप्रीत्यर्थ झिजण्याचा आनंद आदपूर्वक शोधावा.'[१३] नामदारमहोदयांच्या हया नव्या संघटनेची ध्येये कोणती होती हयाचा खुलासा करताना न.र.फाटक लिहितात, 'हिंद सेवक समाजाने आदर्श चारित्र्य, राजकीय चळवळ आणि जातीजातींत सलोख ही तीन कर्तव्ये आदर्श कर्तव्ये मानली. उद्योगधंदे व भौतिकशास्त्रांचे शिक्षण, उद्योगधंद्यांच्या उत्कर्षाला हातभार आणि दलितोध्दार अशी इतर काही महत्वाची कर्तव्ये. हया संघटनेत सामील झालेल्या व्यक्तीने नोकरी, व्यवसायात पडू नये. समाज त्यांच्यासाठी जी व्यवस्था करेल, त्यावर त्याने गुजराण करावी. शिस्त, निष्कलंक चारित्र्य, देशसेवा हे गुण अंगी येण्यासाठी स्वयंसेवकाने पहिली पाच वर्षे उमेदवारी केली पाहिजे, अशी आचारसंहिता शिष्यांसाठी बनविण्यास आली.'

हिंद सेवक समाज कोणत्या पध्दतीने स्वयंसेवक निवडत असे, हे डॉ.राजेंद्रप्रसाद हयांनी आपल्या आत्मकथेत लिहून ठेलेले आहे. प्रसिध्द विद्वान श्रीनिवासशास्त्री तसेच पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरु मुकुंदराव रामराव जयकर हे त्यांच्या संघटनेत दाखल झालेले काही मान्यवर नेते. अभ्यास व विद्वत्ता ही प्रत्येक सभासदासाठी आवश्यक होती. मुंबईत असलेल्या काही संघटनांप्रमाणे हयाही संघटनेत निबंधवाचन, चर्चा, वादविवाद हयांवर भर दिलेला होता. असे वादविवाद ऐकण्यासाठी कधीकधी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड हयांसारख्या बडया असामीही हजर असत. इ.स.१८९७ पासून, अशी एखादी मिशनरी स्वरुपाची संस्था समाज व देशसेवेसाठी काढावी, असा विचार गोखल्यांच्या मनात घोळत होता. या विचारांना १२ जून १९०५ रोजी मूर्त स्वरुप प्राप्त झाले. आपल्या नव्या संघटनेची उद्दिष्टये त्यांनी अनेकांना समजावून सांगितली. फिरोजशहा मेहतांसारख्या जेष्ठ नेत्यांना हिंद सेवक समाजाची कल्पना आवडली नाही. सरकार दरबारी त्यांच्या हया नव्या कार्याविषयी संशय होता व तो संशय कायम राहिला. संस्थेने फक्त समाजसुधारणा करावी की राजकारणही करावे, हयाविषयीही संघटनेच्या पदाधिकाऱ्यात मतभेद होते. कालांतराने हे मतभेद दूर झाले व समाजकारणाबरोबर राजकारण करण्यास हरकत नाही, कार्यकर्ते हे राष्ट्रीय वृत्तीचे मिशनरी असतील, हा विचार संघटनेत सर्वमान्य झाला.

मुंबई - पुण्यातील हिंदू, मुसलमान, पारशी जातीतील श्रीमंत व्यक्तींनी हया संघटनेस आर्थिक साहाय्य देऊ केले. त्यातून संस्थेची इमारत व वाचनालय उभारण्यात आले. हिंद सेवक समाज ही बुध्दिवादी संघटना. ग्रंथसंग्रहावर व चर्चा - परिसंवादांवर हया संघटनेचा पहिल्यापासून भर होता. हया संस्थेचा ग्रंथसंग्रह आजदेखील महाराष्ट्रात पहिल्या दर्जाचा ग्रंथसंग्रह मानला जातो. फारसा गाजावाज न करता सुरु झालेली ही संघटना महाराष्ट्रातील एक ध्येयवादी संघटना म्हणून ओळखली जाते. आदर्शवाद, राष्ट्रभक्ती हे त्या काळातील परवलीचे शब्द होते. इंग्रजी राजवट, त्यांची शिस्त, त्यांची आधुनिकता, त्यांची भौतिक प्रगती हयामुळे एतद्देशीयांचे डोळे दिपून गेले होते. त्या भावनेला देशभक्तीचा मुलामा देण्याची तीव्र इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. मिशनऱ्यांची कळकळ आणि त्याग हयांचे राष्ट्रवादात रुपांतर केले, तर देशात जादू केल्याप्रमाणे बदल होतील, देश स्वतंत्र होईल, समाज आधुनिक बनेल, हया विचाराने प्रेरित होऊन हिंद सेवक समाजाची मुहूर्तमेढ रोवली गेली, पण दुर्दैवाने हया संघटनेने मूळ काही धरले नाही. कल्पना तशी विदेशी. ही प्रवृत्ती कितीही स्वीकारार्ह असली. तरी ते गुण रक्तात असणे आवश्यक होते. मिशनरी वृत्ती कितीही आदर्श असली, तरी भारतीयांमध्ये ती अभावानेच आढळते. त्यामुळे हिंद सेवक समाजाची कल्पना वृत्तपत्रांत चर्चिली गेली, सभा - संमेलनात ती थोडी बहुत गाजली. पण तिला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. संघटनेतील अनुयांयाची संख्या मर्यादितच राहिली. पुण्यात हिंद सेवक समाजाची मोठी स्थावर मालमत्ता आहे. विद्वानांसाठी भाषणे - निबंध - चर्चा - परिसंवाद घडवून आणण्यासाठी अनेक सुविधा हया संघटनेत उपलब्ध होत्या. गोखल्यांच्या हयातीत तर अनेक मान्यवर नेत्यांनी हिंद सेवक समाजामध्ये पायधूळ झाडली. एवढी सगळी संघटनात्मक पुण्याई असूनही, संघटना गोखल्यांच्या नावाशी आणि कार्याशी जोडली गेलेली असूनही ती लोकप्रिय झाली नाही. अखिल भारतीय पातळीवर ती संघटना नावारुपास यावी, असे जे स्वप्न नामदार गोखल्यांना पाहिले, ते पूर्ण झाले नाही. ही संघटना केवळ एक बुध्दिजीवी लोकांची स्वप्नाळू कल्पना ठरली.

ही संघटना एक ॲकॅडमिक संस्था - शैक्षणिक संस्था म्हणपून आज ओळखली जाते. नव्याने संस्थेत प्रवेश करणारी माणसे कर्तव्यापेक्षा संस्थेच्या मिळकतीवर डोळा ठेवनू प्रवेश करु लागली. सेवेची गरज सरत नाही, पण कालानुसार तिचे स्वरुप बदलते आणि ते स्वरुप ध्यानात घेऊन त्याप्रमाणे सेवेला कार्यक्षम वळण देण्याला जर धडाडीचा प्रतिभाशाली पुरुष संस्थेतून पुढे न आला - तो न येण्याचीच शक्यता जास्त असते - तर संस्था संचितावर जगते, परंतु कामात राम उरत नाही,'[१४] अशा अर्थाचे विचार गोखलेसाहेबांनी एका वेगळया संदर्भात व्यक्त केले होते, ते त्यांच्याच लाडक्या संस्थेलाही लागू पडतात.

जहाल - मवाळ मतभेदाचा फटका हया संघटनेलाही बसला. पुणे शहराने लो.टिळक व नामदार गोखले असे दोन लोकोत्तर कीर्तीचे नेते निर्माण केले खरे, पण त्या दोन नेत्यांत कधी सख्य नव्हते, हे सर्वश्रुत आहे. टिळकपक्षीय हिंद सेवक समाजामध्ये काम करणाऱ्यांना ङ्गमाळावरचे महारोगीङ्ख हया नावाने संबोधत होते. आज जेथे फर्गसन महाविद्यालयाच्या पाठीमागे टेकडया आहेत, पायथ्याशी जमीन आहे तेथे हिंद सेवक समाजाच्या इमारती आहेत. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी तील सर्व्हंट्स हया शब्दांचेही त्यांनी सुरवंट असे विडंबन केले. हिंद सेवक समाजाने राजकारणाचे म्हणजे पर्यायाने सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मीकरण घडवून आणण्याचा एक स्तुत्य प्रयोग केला. दुर्दैवाने त्या प्रयोगास यश आले नाही. राजकारणाकडे धार्मिक दृष्टीकोनातून पाहावे, हया राजकारणाला परमेश्वरी पातळीवर नेऊन पोहोचवावे, राजकारणाला एक धर्म म्हणून मानले की, सार्वजनिक जीवन, चारित्र्य शुध्द होईल, अशी त्यांची अटकळ होती, पण ही कळकळ, अंत:करणातील तळमळ भारतीयांमध्ये न सापडल्यामुळे त्यावर बेतलेली ही संस्थेची इमारत कोलमडून पडली. हिंद सेवक समाजाने नामदारसाहेबांच्या काही मर्यादाही स्पष्टपणे सिध्द केल्या आहेत. गोखल्यांचा पिंड हा बुध्दिवादी. प्रचंड विद्वत्ता, पाश्चात्त्यांच्या राजकारणाने व समाजकारणाचे उत्तम ज्ञान, बहुश्रुत व अभ्यासू वृत्ती हया गुणविशेषांसाठी ते प्रसिध्द असले, तरी संघटनात्मक कौशल्यासाठी त्यांची प्रसिध्दी नव्हती. काँग्रेसमधील सर्वच मवाळ नेते बोलघेवडे, चांगले वाक्पटू, पण जहाल नेत्यांना अनुयांयाचा जसा पाठिंबा होता, टिळकासारख्या जहाल नेत्यांकडे जशी उदंड लोकप्रियता होती, तशी ती गोखल्यामागे नव्हती. अनुयायांचे जर त्यांना पाठबळ असते, तर हिंद सेवक समाजाने मूळ धरले असते, त्या संघटनेचा साऱ्या भारतवर्षात शाखाविस्तार झाला असता, पण दुर्दैवाने असे सच्चे अनुयायी मिळविण्यात ते कमनशिबी ठरले, म्हणून त्यांचा हा हिंद सेवक समाजाचा प्रयोगही कोलमडला.

हिंद सेवक समाज हा गोखल्यांच्या काळात व त्यांच्या निधनानंतरही विद्वान मंडळींची एक संघटना म्हणून ओळखला जात होता. समाजाची ही ओळख मात्र पुढे चांगली होत गेली व स्वातंत्र्योत्तर काळातही हया समाजाने आपले विद्यादानाने कार्य निष्ठेने पुढे चालविले.

**संदर्भ -**

१. कुमार रविंदर - वेस्टर्न इंडिया इन द नाइन्टिन्थ सेच्युरी, टोरॉंटो, १९६८, पृष्ठ - १५६
२. कित्ता, पृष्ठ - १५९
३. कित्ता, पृष्ठ - १६०
४. कित्ता, पृष्ठ - १८२
५. कित्ता, पृष्ठ - १८७
६. कित्ता, पृष्ठ - १८६
७. मेहरोत्रा एस.आर. - द इमर्जन्स ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस, दिल्ली, १९७१, पृष्ठ - १७३
८. कित्ता, पृष्ठ - १८८
९. कित्ता, पृष्ठ - १८९
१०. कित्ता, पृष्ठ - १८०
११. देवगिरीकर त्र्यं.र. - वासुकाका जोशी व त्यांचा काळ, पुणे १९४८, पृष्ठ - ३०९
१२. कित्ता, पृष्ठ - ३११
१३. फाटक न.र. - आदर्श भारतसेवक, मुंबई, १९६७, पृष्ठ - ७४
१४. कित्ता, पृष्ठ - ८२